## निशाणी क्रं.२३ वरील आदेश

१. प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी प्रस्तुत अर्ज कैफियतीमध्ये दुरुस्ती करणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेले आहे.

२. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात असे कथन केलेले आहे की, सदर दाव्यास दिनांक ०६/०४/२०१३ रोजी प्रतिवादींनी कैफियत दाखल केलेली आहे. वादीने दाव्यात दिनांक ३१/०५/२००४ रोजीचे तथाकथित रजि.मृत्युपत्र हे बेकायदेशीर आहे असे जाहीर ठराव करुन मागितलेला आहे. प्रतिवादींनी कैफियतीत कलम ३ मध्ये वरुन चौथी ओळीत रजिष्टर मृत्युपत्र ऐवजी टायपिंग मिस्टेकने बक्षीसपत्र असे लिहिले गेलेले आहे. त्यामुळे त्याठिकाणी **बक्षीसपत्र ऐवजी मृत्युपत्र** असे नमुद करुन दुरुस्ती करणेकरीता प्रस्तुत अर्ज मंजुर करणेची विनंती केलेली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. वादी कथन करतात की, प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर असुन अर्जात मागितलेली दुरुस्तीमुळे कैफियतीच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींनी कथन केल्याप्रमाणे त्यांनी प्रस्तुत

दाव्यास दाखल केलेल्या कैफियतीमध्ये रजिष्टर मृत्युपत्राऐवजी टायपिंग मिस्टेक होवुन बक्षीसपत्र असे नमुद करणेत आलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे. याउलट वादींनी सदर दुरुस्तीमुळे कैफियतीच्या स्वरुपात बदल होत असल्यामुळे अर्ज नामंजुर करणेची विनंती केलेली आहे. अर्ज व म्हणणेचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा मृत्युपत्रासंबंधीत आहे व कैफियत ही देखील सदर मृत्युपत्राच्या आधारे संबंधीत प्रतिवादी तर्फे दाखल करणेत आलेली आहे. परंतु मृत्युपत्राऐवजी बक्षीसपत्र कैफियतीमध्ये नमुद केले गेल्याचे प्रतिवादींचे कथन आहे. सदर दुरुस्ती दाव्यात केल्यास दावा गुणदोषावर निर्णयित होणार आहे व दाव्यातील संभ्रम कमी होणेस मदत होणार आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे आवश्यक दुरुस्ती करता येतात. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये बदल होणार नाही शिवाय दावा संपुर्ण गुणदोषावर निर्णय होणे सोयीस्कर होणार आहे. करिता सदरची दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. २३ वरील अर्ज मंजुर करण्यात येते. |
| २. | अर्जदाराने नियमानुसार १४ दिवसांच्या आत अर्जामध्ये दुरुस्ती करुन, दुरुस्ती अर्जाची प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी. |

Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.08.05 16:28:24 +0530

**(आदित्य अ. व्यास)**

दिनांक : ०५.०८.२०२६.

२रे सह दिवाणी न्यायाधिश,क.स्तर,
माळशिरस

**CERTIFICATE**

I affirm that the contents of the P.D.F file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer :- S.T.Korbu

(b) Name of the Court : 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C, Malshiras,
Dist. Solapur

(c) Order signed by P.O. On :- 05/08/2026.

(d) Order uploaded on :- 05/08/2026.